# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः09.12.2025** **वारःमंगळवार**

---

1. राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाला नागपुरात सुरुवात; पहिल्याच दिवशी 75 हजार 286 कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर
2. वंदे मातरम् हे केवळ एक गीत नाही, तर ते भारतीयांच्या मनात वसलेलं समृद्ध भारताचं चित्र आहे-पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
3. श्रमिकांसाठी झटणारे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बाबा आढाव यांचं पुण्यात निधन आणि
4. महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सवात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला सर्वसाधारण विजेतेपद

**राज्य-विधिमंडळ**

विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या कामकाजाला काल नागपुरात 'वंदे मातरम्' या राष्ट्रगानानं तसंच 'जय जय महाराष्ट्र माझा' या राज्य गीतानं सुरुवात झाली. त्यानंतर 'वंदे मातरम्' गीताला दीडशे वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त वंदे मातरम्चं संपूर्ण गायन करण्यात आलं. विधान परिषदेत तालिका सभापतींच्या नियुक्तीची घोषणा सभापती राम शिंदे यांनी केली तर विधानसभेत अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी तालिका अध्यक्षांच्या नावांची घोषणा केली.

हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी राज्य सरकारनं 75 हजार 286 कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या मांडल्या. त्यातले 15 हजार 648 कोटी रुपये अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईसाठी राखीव आहेत.

लाडकी बहीण योजनेसाठी 6 हजार कोटींहून अधिक तर मनरेगासाठी साडे तीन हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. नाशिकमध्ये होणाऱ्या कुंभमेळ्यासाठी तीन हजार कोटी रुपये तर एसटी महामंडळासाठी दोन हजार कोटी रुपये दिले जाणार आहेत. आयुष्मान भारतासाठी सव्वा तीन हजार कोटी आणि स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी 2 हजार 200 कोटी रुपयांची तरतूद सरकारनं यात केली आहे.

काँग्रेसचे नेते नाना पटोले आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे भास्कर जाधव यांनी हे अधिवेशन वाढवून देण्याची मागणी अध्यक्षांकडे केली. विधिमंडळाचं कामकाज गुंडाळण्याचा प्रयत्न करण्यात येत असून कामकाज घाईघाईनं उरकलं जात आहे, असा आरोप पटोले यांनी केला. यावर विधिमंडळाचं अधिवेशन आणि कामकाज यावर कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत सर्वसंमतीनं निर्णय होतो, त्यामुळे आता त्यावर वेगळी चर्चा होणार नाही, असं अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सांगितलं. तर आचारसंहितेमुळे हे अधिवेशन अल्पकालीन असल्याचं स्पष्ट करून हा कालावधी पुढील अधिवेशनात भरून काढू अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

दिवंगत माजी मंत्री, माजी आमदार यांना श्रद्धांजली वाहिल्यानंतर सभागृहाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

**मोदी-वंदे मातरम्**

भारत आणि भारतीयांमध्ये प्रत्येक प्रश्न, प्रत्येक संकटाचा सामना करण्याची ताकद आहे, आणि वंदे मातरम् हे गीत त्या ताकदीचं प्रतिक आहे असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल लोकसभेत केलं. वंदे मातरम् या राष्ट्रीय गीताला दीडशे

वर्षं पूर्ण झाल्या निमित्तानं लोकसभेत एक विशेष चर्चा झाली, त्यावेळी मोदी बोलत होते. वंदे मातरम् हे केवळ एक गीत नाही, तर ते भारतीयांच्या मनात वसलेलं समृद्ध भारताचं चित्र आहे, असं मोदी म्हणाले....

**देश के महापुरुषों का सपना था। स्वतंत्र भारत का देश की आज की पीढ़ी का सपना है समृद्ध भारत का आजाद भारत का सपने को सींचा था। वंदे भारत की भावना है वंदे मातरम की भावना ने समृद्ध भारत के सपने को सींचेगा वंदे मातरम की भावना उसी भावना को लेकर के हमें आगे चलना है और हमें आत्मनिर्भर भारत बनाना टेंटी फोर्टी सेवेन में देश विकसित भारत बन के रहे। अगर आजादी के पचास साल पहले कोई आजाद भारत का सपना देख सकता था तो पच्चीस साल पहले हम भी तो समृद्ध भारत का सपना देख सकते हैं। विकसित भारत का सपना देख सकते हैं और इस सपने के लिए अपने आपको खपा भी सकते हैं। इसी मंत्र इसी संकल्प के साथ वंदे मातरम हमें प्रेरणा देता रहे वंदे मातरम का हम रण स्वीकार करे वंदे मातरम की भावना को लेकर के चले देशवासियों को साथ लेकर के चले हम सब मिल कर के चले इस सपने को पूरा करे।**

यावेळी पंतप्रधानांनी वंदे मातरमच्या दीडशे वर्षांच्या इतिहासाचा मागोवा घेतला. तसंच काँग्रेसच्या धोरणांवर टीका केली. या चर्चेत भाग घेताना कॉंगेस नेत्या प्रियांका गांधी वद्रा यांनी वंदे मातरम् हा राष्ट्राचा आत्मा असल्याचं सांगितलं. सरकार यावरून राजकारण करत असून लोकांचं लक्ष त्यांच्या पुढील मुख्य प्रश्नांपासून दुसरीकडे वळवण्याचा प्रयत्न करत आहे, असा आरोप प्रियंका गांधी यांनी केला. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, कॉँग्रेस नेते गौरव गोगोई यांनी ही या चर्चेत भाग घेतला.

**ध्वजदिन**

सैनिकांनी देशासाठी केलेलं समर्पण कुठल्याही मूल्यांमध्ये मोजता येत नाही. देशासाठी त्याग करणाऱ्या सैनिकांच्या कुटुंबांना मदत करण्यासाठी ध्वजदिन निधी मोठा मार्ग असल्याचं मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल नागुपरात व्यक्त केलं. सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनाचा प्रारंभ काल फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनात नागरिकांनी आपापल्या परीने सहभाग देऊन सेनेप्रती आपला भाव व्यक्त करावा, असं आवाहन मुख्यमंत्र्यांनी केलं.

**बाबा आढाव निधन**

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि कष्टकरी आणि श्रमिकांचे आधारस्तंभ बाबा आढाव यांचं काल पुण्यात वृद्धापकाळानं निधन झालं. ते 95 वर्षांचे होते. गेल्या काही दिवसांपासून त्यांच्यावर उपचार सुरू होते. उपचारादरम्यान काल त्यांचं निधन झालं. बाबा आढाव यांचं पार्थिव आज सकाळी 10 वाजता अंत्यदर्शनासाठी हमाल भवन इथं ठेवण्यात येईल. संध्याकाळी 4 वाजता त्यांच्या पार्थिव देहावर अंत्यसंस्कार करण्यात येतील.

बाबा आढाव यांनी शेतमजूर, हमाल आणि असंघटित कामगारांच्या हक्कासाठी आजीवन संघर्ष केला. त्यांचा जन्म 1930 मध्ये पुण्यात झाला. 1960 पासून त्यांनी असंघटित कामगारांच्या हक्कासाठी आंदोलनाला सुरुवात केली. हमाल पंचायत या संघटनेची स्थापना करुन त्यांना सामाजिक सुरक्षितता मिळवून देण्यासाठी ते कार्यरत होते. जातीभेदाविरुद्ध एक गाव एक पाणवठा ही चळवळ त्यांनी संपूर्ण राज्यात राबवली. राष्ट्र सेवा दलात आरंभापासून त्यांनी भाई वैद्य, पन्नालाल सुराणा, बापूसाहेब काळदाते यांच्यासह अन्य समाजवादी नेत्यांबरोबर काम केलं. 1963 आणि 1968 मध्ये ते पुणे पालिकेत नगरसेवक होते. आपलं संपूर्ण आयुष्य कष्टकरी श्रमिकांच्या हक्कांसाठी, समाजासाठी वेचणाऱ्या बाबा आढाव यांच्या निधनाबद्दल सर्व स्तरातून दुःख व्यक्त करण्यात येत आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे, ज्येष्ठ नेते शरद पवार, लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी, केंद्रीय राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ तसंच कॉँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी बाबा आढाव यांच्या निधनाबद्दल तीव्र दु:ख व्यक्त केलं आहे.

**पुस्तक-महोत्सव**

पुण्यात येत्या 13 ते 21 डिसेंबर दरम्यान 'पुणे पुस्तक महोत्सव' 2025 चं आयोजन करण्यात आलं आहे. पुणे पुस्तक महोत्सवाचा एक भाग म्हणून दरवर्षीप्रमाणे 'शांतता पुणेकर वाचत आहेत' हा उपक्रम आज राबवला जात आहे. शासकीय अधिकारी कर्मचारी, विद्यार्थी आणि सर्वच नागरिकांनी आज सकाळी 11 ते 12 या वेळेत आप-आपल्या ठिकाणी आपल्या आवडीचं पुस्तक वाचावं, असं आवाहन आयोजकांनी केलं आहे.

**महाजन-कुंभमेळा**

नाशिकमध्ये होणाऱ्या आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या संदर्भात सरकारनं पर्यावरण संरक्षणाच्या अनुषंगानं आपली भूमिका स्पष्ट केली आहे. कुंभमेळ्याच्या व्यावसायिक किंवा विकासकामांसाठी एकही झाड तोडलं जाणार नाही, अशी ग्वाही कुंभमेळा विभागाचे मंत्री गिरीश महाजन यांनी दिली आहे. ते काल नागपूरमध्ये माध्यमांशी बोलत होते. ते म्हणाले.....

**वृक्षप्रेमींची नाशिककरांची जी भूमिका आहे ती आमची भूमिका आहे. शासनाची आहे. माननीय मुख्यमंत्री महोदयांचं माझं या संदर्भामध्ये बोलत आहे मी त्यांची भेट घेतलेली आहे. त्यांनी मला त्या दिवशी सूचना दिल्या होत्या फोन वरून सुद्धा. आम्ही एकही झाड तोडणार नाही. एकही झाड तोडणार नाही म्हणजे मागच्या वेळी गेल्यावेळी ज्यावेळेला कुंभमेळा झाला त्यावेळेला साधुग्राम होते तिथे आम्ही राउट्या टाकलेल्या होत्या. त्या जेवढ्या होत्या. त्याच्यापेक्षा एक फुटे जागा आम्ही जास्त घेणार नाही. मला वाटतं कुंभमेळा आपल्यासाठी सर्वांसाठी महत्त्वाचा आहे. सगळ्या देशात आणि जगाचं लक्ष तिकडे लागलेलं आहे. आणि अशा वेळी झाडं तोडणार आहोत आम्ही सगळं सपाट करणार आहोत असं अजिबात कोणी गैरसमज करू नये. दोन वर्षांमध्ये तिथे अशी वनराई होईल की सगळे नाशिककर फिरायला बघायला त्या ठिकाणीच जातील.**

**आंतर विद्यापीठ क्रीडा-नांदेड**

नांदेडमधल्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात झालेल्या महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सवाचं सर्वसाधारण विजेतेपद सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठानं पटकावलं आहे. मुंबई विद्यापीठाला उपविजेतेपद मिळाले. तर, छत्रपती संभाजीनगरमधल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठानं तृतीय पारितोषिक मिळवलं. नाशिकच्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे यांच्या हस्ते काल पारितोषिक वितरण करण्यात आलं.

**क्रिकेट**

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील पाच सामन्यांच्या टी-ट्वेंटी क्रिकेट मालिकेला आजपासून सुरुवात होत आहे. सलामीचा सामना आज संध्याकाळी सात वाजता ओडिशातल्या कटक इथल्या बाराबती मैदानावर खेळला जाईल.

**हवामान**

राज्यात सर्वत्र हवामान कोरडं असून उत्तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात किमान तापमानात किंचित घट झाली आहे. येत्या दोन दिवसात विदर्भात तुरळक ठिकाणी थंडीची लाट येण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.